<u>नियमित फौजदारी खटला क्र. ४०/२०२४</u>

<u>नि.क्र. ३६/क</u>

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | मंगेश रमेश राठोड |
| वय | – | २९ वर्षे |
| व्यवसाय | – | गवंडीकाम |
| राहणार | – | इलाईट हॉटेल, वाघोडे, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी.एस.पाटील यांच्यामार्फत...</u>**

१. दिनांक ०२.०२.२०२४ रोजी मी इलाईट हॉटेल येथे कामास होतो. त्यादिवशी काय झाले ते मला माहिती नाही. आज न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस मी ओळखत नाही.

**(साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नाही. म्हणून सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, प्रणिता पाटील या सुध्दा इलाईट हॉटेल येथे कामाला होत्या. हे मला माहिती नाही की, प्रणिता पाटील यांचे पती राजेश पाटील यांचे इलाईट हॉटेल येथे येणेजाणे असायचे. हे मला माहिती नाही की, दिनांक

०२.०२.२०२४ रोजी आरोपी व राजेश पाटील यांच्यामध्ये भांडण झाले होते. हे मला माहिती नाही की, आरोपीने राजेश पाटील यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली होती.

३. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. आता मला दिनांक ०६.०२.२०२४ रोजीच्या जबाबातील अधोरेखित मजकूर 'भाग अ' वाचून दाखवला. परंतु, त्यामधील मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. परंतु, सदरचा मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबात का लिहिला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. अतुल मयेकर यांच्यामार्फत...**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

अलिबाग, (डी.एम.झाटे)

दिनांक – ०५.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग

नियमीत फौजदारी खटला क्र. **४०/२०२४**
निशाणी क्र. **१०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संतोष गोपाळ पाटील** |
| वय सुमारे | : | ५० वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | पळी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत** :

दि. ०४/०२/२०२४ रोजी मला पोयनाड पोलीस ठाण्यातील पोलीसांनी इलेक्ट्रीक हॉटेलच्या समोर घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. घटनास्थळ फिर्यादी प्रणिता पाटील हिने दाखविले. त्यानंतर पंचनामा केला. पंचनामा सकाळी ११.०० वाजता सुरु होवून १२.३० वाजता संपला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ११** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत** :

२. फिर्यादीने मला फोन करुन बोलावले होते. फिर्यादी व तिचे पती माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जेथे पंचनामा केला तेथे बाजूला बंगल्याचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दगड, विटा, शिगा, रेती, इत्यादी पडलेले होते. रस्त्यावर रेती पडलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६/०२/२०२४ रोजी मला कोठेही बोलावलेले नव्हते. मला लिहीता वाचता येत

नाही. मी पंचनाम्यात पोलीसांनी काय लिहीले ते वाचून

:: २ ::

पाहिले नाही. पोलीसांनी पंचनामा स्वत: लिहीला आणि पोलीसांनी मला सही करायला सांगितले म्हणून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी आज फिर्यादीचा पती राजेश याच्यासोबत कोर्टात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजेशने मला काय साक्ष द्यायची हे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व तिचा पती माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पोलीस ठाण्यात तयार केलेल्या पंचनाम्यावर मी सही केली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **श्रीमती एस्. डी. सोनी** )
दिनांक : **२२/१०/२०२४**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **४०/२०२४**
निशाणी क्र. **१४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रणिता राजेश पाटील** |
| वय सुमारे | : | ३१ वर्षे, व्यवसाय : खाजगी नोकरी |
| निवासस्थान | : | मु. कोळघर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

मी नागझरी येथील डिलाईट हॉटेल ॲन्ड स्वामी कृपा डेव्हलपर कंपनी येथे अकाऊंटंट ॲन्ड प्लॅट मॅनेजर म्हणून कामाला आहे. माझ्या कामाची वेळ सकाळी १०.३० ते सायं. ६.३० अशी आहे. तेथे प्लॅट डेव्हलपमेंटचे काम चालू असल्यामुळे तेथे किती मटेरियल लागणार आहे, किती माणसे लागणार आहेत याचे काम मी पाहात होते.

०२. दि. ०२/०२/२०२४ रोजी मी नेहमीप्रमाणे कामावर गेले. गेस्टला बंगले भाड्याने दिले जाते. तेथे ॲक्टर्स येणार होते त्यामुळे सगळे व्यवस्थित आहे का हे पाहण्यासाठी मी बंगल्यावर गेले होते. कामाची पाहणी करत असताना थोड्याच वेळात मला फोन आला व मला फोनवर मला, 'तू मटेरियल दुसऱ्याकडून का घेतेस? माझ्याकडून मटेरियल का घेत नाहीस? मी त्यांना सांगितले की, आमच्या शेठने ज्यांच्याकडून मटेरियल घेण्यास सांगितले त्यांच्याकडून घेतले, तुम्ही शेठसोबत बोला.' त्यावर मला फोनवरुन, 'तुझ्या आयची गांड, मादरचोद,

आयझवाडे, तू खाली ए तुला दाखवतो.' अशी शिवीगाळ करण्यात आली. मला

१५ ते २० लोकांसमोर शिवी दिल्यामुळे माझ्या मनास लाज उत्पन्न झाली. सर्व कामगार माझ्याशी रिस्पेक्ट देवून बोलतात. सदर फोन सुमित माने यांचा होता. सुमित माने याने त्याचा फोन क्र. ९८६०००८०५२ या क्रमांकावरुन फोन केला होता. त्यावेळी मी पाच महिन्यांची गरोदर होते. आरोपी 'तू खाली ये तुला दाखवतो' असे म्हणाला त्यामुळे मला भिती वाटली.

०३. माझे पती तिथे नेटवर्कींगचे काम पाहतात. मी त्यांना आधीच तेथे नेटवर्कींगच्या कामाकरीता बोलावले होते. माझ्या पतीला सेक्युरिटीवाले आत सोडत नव्हते. सेक्युरिटी सुमित माने यांचीच होती. मी माझ्या पतीला सांगितले की, तुम्ही गेटजवळच थांबा, मी येते. माझ्या पतीने हॉटेलच्या करण चावला यांना फोन केला. त्याने सेक्युरिटीला माझ्या पतीला आत सोडण्यास सांगितले. मी गेटजवळ जात असताना माझे पती आत आले. मी तेथे पोहोचणारच होते तेवढ्यात सुमित माने तेथे आला. त्याने माझ्या पतीला शिवीगाळ करुन 'तू आत कसा आलास?' असे विचारले. माझ्या पतीने त्याला नेटवर्कींगचे काम करण्यासाठी आल्याचे सांगितले. त्यानंतर त्याने माझ्या पतीच्या शर्टची कॉलर पकडून गाडीवरुन खाली खेचले व तोंडावर उजव्या बाजूला फाईट मारली. तसेच त्याने माझ्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. मारहाण केल्यामुळे माझ्या पतीच्या उजव्या हाताच्या करंगळीला सूज आली व डाव्या हातास व उजव्या कानाच्या पाठीमागून रक्त येत होते. मी माझ्या पतीला सोडवण्यास गेली असता सुमित माने याने माझ्या तोंडावर फाईट मारली व धक्काबुक्की केली. त्यामुळे माझे ओठ सुजले होते. त्यानंतर तेथील कामगार राठोड व इतर कामगारांनी येवून सोडवासोडव केली. सुमित आम्हाला 'तुम्हाला बघून घेईन' असे बोलून निघून गेला. त्यानंतर मी व माझे पती पोयनाड पोलीस ठाण्यात

गेलो. पोलीसांनी आम्हाला लागलेले पाहून उपचारासाठी पत्र दिले.

आरोपीने पोलीस ठाण्यात आम्हाला बघून घेईन अशी धमकी दिली.

०४.　　आम्ही प्राथमिक आरोग्य केंद्र, पोयनाड येथे गेलो होतो. माझ्या पोटात दुखत असल्याने त्यांनी आम्हाला अलिबाग येथील दवाखान्यात जाण्यास सांगितले. उपचारादरम्यान माझा बी.पी. हाय झाला होता व माझ्या पतीचा बी.पी. हाय होवून त्यांना चक्कर येत होती. त्यामुळे माझ्या पतीला अलिबाग येथील हॉस्पीटलमध्ये ॲडमिट करुन घेतले होते. दि. ०३/०२/२०२४ रोजी माझ्या पतीला डॉक्टरांनी सांगितले की, तुमच्या बोटाला फ्रॅक्चर झाले आहे. त्यानंतर आम्ही पोयनाड पोलीस ठाणे येथे गेलो व फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १६** देण्यात येते.

०५.　　पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. त्यानंतर पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. ज्या ठिकाणी घटना घडली होती त्या ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेज घेण्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी फुटेज पेन ड्राईव्हमध्ये घेतले होते. दोन पंचांसमक्ष ते पेन ड्राईव्ह जप्त केले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

०६.　　माझा कोर्टात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे जबाब　घ
ेतलेला आहे. आता मला दाखवण्यात आलेला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम

१६४ प्रमाणेचा जबाब तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही

आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते.

०७. पेन ड्राईव्ह असलेला लखोटा आज न्यायालयासमोर उघडण्यात आला. त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचा कुझर ब्लेड ८ जीबी पेन ड्राईव्ह आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत** :

०८. घटनेच्या पूर्वी दोन वर्षापूर्वीपासून मी डिलाईट हॉटेल ॲन्ड स्वामी कृपा डेव्हलपर कंपनी येथे कामास होते. माझ्या कामाची वेळ १०.०० ते ६.०० अशी होती. कोळघर ते हॉटेल यांतील अंतर वाहनाने अंदाजे २० ते २५ मिनिटांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे हॉटेलचे सेक्युरिटी आणि लेबरचे काम आहे. हॉटेलचे मालक करण चावला आहेत. सुनिल चावंडे हे स्वामी कृपा डेव्हलपरचे कामकाज पाहतात. भगवान पाटील सर हे जागेचे मालक आहेत.

०९. फोन साधारण १०.३० ते १०.४५ वाजताच्या दरम्यान आला होता. फोनवर दीड ते दोन मिनिटे बोलणे झाले. फोनवर चर्चा झाल्यासंदर्भात मी माझ्या मालकांना कळविले होते. मारहाणीची घटना किती वेळ चालली हे मला आता आठवत नाही. माझ्या पतीचा फोन अंदाजे १०.४५ वाजताच्या दरम्यान आला. माझे पतीसोबत साधारणपणे दीड ते दोन मिनिटे बोलणे झाले होते. फोन मी केला किंवा माझ्या पतीने केला हे मला आठवत नाही. मी फिर्याद देताना सांगितले होते की, माझ्या पतीला आत सोडत नसल्यामुळे माझ्या पतीने करण चावला यांना फोन केला. सदर बाब माझ्या फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण मला माहीत नाही.

१०. माझ्या पतीला कोणती शिवीगाळ केली त्याचा उल्लेख फिर्यादीमध्ये

केलेला नाही. माझ्या पतीचा टी शर्ट फाटला होता. टि शर्टला रक्त लागले होते. पोलीसांनी टी शर्ट जप्त केला नव्हता. माझ्या ओठातून रक्त आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तेथील कामगार मला ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, ज्योती जनार्दन पाटील ह्या माझ्या सासू आहेत. सुदेश राऊळ हे माझ्या परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हॉटेल डिलाईटमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा पुरवतात व त्याची देखभाल करतात.

११. कोळघर ते पोयनाड पोलीस ठाणे यातील अंतर ८ कि.मी. असून जाण्यास २० ते २५ मिनिटे लागतात. पोयनाड पोलीस ठाणे ते प्राथमिक आरोग्य केंद्र यामधील अंतर वाहनाने अंदाजे पाच मिनिटांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, डिलाईट हॉटेलमध्ये त्यावेळी नवीन बंगल्याचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, घटना जेथे घडली तेथे नवीन बंगल्याचे काम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल नामांकित असल्यामुळे तेथे ग्राहकांची ये–जा असते. हे मला माहीत नाही की, घटना घडली त्या दिवशी पंचायतीचे लोक बंगल्याच्या जागेचे मोजमाप घ ेण्यासाठी आले होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सी.सी.टी.व्ही. फुटेजचा ॲक्सेस मला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी नेमकाच तेवढा भाग कट करुन पेन ड्राईव्ह पोलीसांना दिला. हे म्हणणे खरे आहे की, व्हीडीओ एडिटरच्या सहाय्याने तेवढा भाग कट करुन पोलीसांना दिला. हे म्हणणे खरे आहे की, सी.सी.टी.व्ही.मध्ये मारहाणीचा प्रकार दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कोणाला फोन करत आहे हे

सुद्धा सी.सी.टी.व्ही. मधून कळून येत नाही. मी फुटेज पोलीसांकडे दिले होते.

:: ६ ::

१३. संतोष गोपाळ पाटील, रतन नवीन गावंड हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बंगल्याचे काम चालू असल्याने घटनास्थळी रेती, दगड, विटा पडलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची नोंद रजिस्टरमध्ये गेटवर केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडल्यानंतर मी हॉटेलमधील काम सोडले. मी काम सोडलेले नाही. आता मी पगार घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माने आताही तेथे कामाला आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला फोनवरुन शिवीगाळ केली, 'तुझ्या आयची गांड, मादरचोद, आयझवाडे, तू खाली ए तुला दाखवतो.' अशी शिवीगाळ केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या पतीला फाईटने, लाथाबुक्यांनी मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला फाईटने तोंडावर मारले, हे मी खोटे सांगत आहे.

१५. पंचनामा किती वाजता झाला हे माझ्या लक्षात नाही. पंचनामा दुपारच्या आधी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सी.सी.टी.व्ही. फुटेजचा मेन स्टोरेज डी.व्ही.आर. असतो. पोलीसांनी सी.सी.टी.व्ही.चा डी.व्ही.आर. जप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी कामावर असताना हॉटेलच्या पैशांची अफरातफर करत होते अशी मानेने माझ्या वरिष्ठांना तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी मानेविद्ध खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती नेटवर्कींग व सी.सी.टी.व्ही.ची देखभाल करत नसल्याची आरोपीने वरिष्ठांकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती गाडीवरुन पडल्यामुळे मला व माझ्या पतीला जखमा झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही

की, त्या जखमांच्या आधारे खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२३/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **४०/२०२४**
निशाणी क्र. **२०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **राजेश जनार्दन पाटील** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी (बी.एस्.एन.एल्.) |
| निवासस्थान | : | मु. कोळघर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. ०२/०२/२०२४ रोजी इलाईट हॉटेलच्या गेटच्या आत घडली होती. मी बी.एस्.एन.एल्. चे इंटरनेटचे काम करण्यासाठी इलाईट हॉटेलच्या आत जात होतो त्यावेळी मला गेटवर अडविण्यात आले. मी माझी पत्नी प्रणिता हिला फोन केला व सांगितले की, मला गेटवर अडविले आहे. मला फोनवर माझ्या पत्नीचा रडण्याचा आवाज आला. मी तिला विचारले की, काय झाले आहे. तिने मला सांगितले की, मला सुमित मानेचा फोन आला होता व त्याने मला शिवीगाळ केली आहे. त्याने तिला 'आयझवाडे, मादरचोद, तुझ्या आयची गांड, तू खाली ये तुला बघतो,' अशी शिवीगाळ केली होती. हॉटेलमध्ये डेव्हलपिंगचे काम चालू होते. त्याकरीता मटेरियल टाकले होते. माझी पत्नी इलाईट हॉटेलमध्ये अकाऊंट व प्लॅन्ट मॅनेजरचे काम करते. सुमित मानेने फोन करुन विचारले की, तू मटेरियल का टाकले? त्यावर माझी पत्नी म्हणाली की, तुम्ही मालकाला विचारुन घ्या. त्यावर त्याने शिवीगाळ केली.

०२. मी माझ्या पत्नीला भेटण्यास जात असताना सुमित मानेने मला पकडले व माझी कॉलर पकडली. त्याने मला आत का आलास? अशी विचारणा

केली. मी त्याला इंटरनेटचे काम करण्यास आलो आहे असे सांगितले. त्याने

कॉलर पकडून माझ्या डोक्यामध्ये फाईट मारली. साक्षीदार सांगतो की, त्याने मला जबड्यावरही फाईट मारली होती. त्याने दोन्हीकडे फाईट मारलेली आहे. मी खाली पडलो असता त्याने मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे माझ्या उजव्या हाताच्या करंगळीच्या बाजूचा बोट फ्रॅक्चर झाला होता व सूजला होता. माझ्या डाव्या कानाच्या येथून रक्त येत होते. माझ्या उजव्या कानाच्या पाठीमागूनही रक्त येत होते पण ते कमी येत होते.

०३.  त्यानंतर राठोड यांनी व त्यांच्या मुलाने सोडवासोडव केली. सुमित माने याने माझ्या पत्नीच्या तोंडावरही फाईट मारली होती. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. तेथून आम्हाला आधी पेझारी येथील हॉस्पीटलमध्ये पाठविले. त्यानंतर मला अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात आले. तेथे मला ॲडमिट करण्यात आले होते. त्यावेळी माझ्यासोबत माझी पत्नी होती. ०३ तारखेला मला डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर ०५ तारखेला माझ्या पत्नीने पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

०४.  मला शेरमकर मॅडमनी इलाईट हॉटेलमधील सी.सी.टी.व्ही. फुटेज काढण्यास सांगितले होते. इलाईट हॉटेलमधील सी.सी.टी.व्ही.चे मेंटेनन्स मी बघत होतो. मी फुटेज काढून पेन ड्राईव्हमध्ये शेरमकर मॅडमना दिले होते. दि. ०२/०२/२०२४ रोजीचे १०.४५ ते ११.१५ वाजताच्या दरम्यानचे फुटेज मी दिले होते.

०५.  पेन ड्राईव्ह सरकारी वकीलांच्या एच्.पी. कंपनीच्या लॅपटॉपवर लावण्यात आले. पेन ड्राईव्ह हे सॅन्डीस्क कंपनीचे असून पेन ड्राईव्हमध्ये दोन फुटेज सी.सी.टी.व्ही. कॅमेरा–१ व सी.सी.टी.व्ही. कॅमेरा–२ असे आहेत. सी.सी.टी.व्ही.

कॅमेरा–१ फुटेज सुरु करण्यात आले. ते ११ मिनिटांचे चित्रीकरण असून

त्यामध्ये आरोपी सुमित माने हा फोनवर बोलताना दिसत आहे. त्याच्या हावभावावरुन तो भांडण करत असल्याचे दिसत आहे. तो जोरजोरात बोलताना वाटत आहे. माझी पत्नी प्रणिता त्या ठिकाणी चालत येताना दिसत आहे. तिच्या हातात मोबाईल आहे. बाकी लोक भांडण झाले त्या ठिकाणी धावत जाताना दिसत आहेत.

०६. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा–२ फुटेज सुरु करण्यात आले. ते २०.४८ मिनिटांचे चित्रीकरण असून ते गेटवरील आहे. त्यामध्ये मी आतमध्ये जाताना दिसत आहे. थोड्या वेळाने माणसे धावत आत जाताना दिसत आहेत. या चित्रीकरणासंदर्भात मी पेन ड्राईव्ह व भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र दिलेले आहे. पेन ड्राईव्ह आणि भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र यांस अनुक्रमे **निशाणी क्र. २१ व २२** देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. त्यास मी ओळखतो.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत</u>** :

०७. अंदाजे एक ते दोन वर्षापूर्वीपासून मी इंटरनेटची सुविधा हॉटेलला पुरवत होतो.

**साक्षीदाराने विनंती केली की, त्याचे नातेवाईक मयत झाल्याने त्याला जायचे असल्याने त्याच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०५/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

:: ४ :: नियमीत फौजदारी खटला क्र. **४०/२०२४**
**निशाणी क्र. २०/क पुढे चालू**

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

०८. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी व सुमित हे एकाच हॉटेलमध्ये काम करत होते. मी हॉटेलच्या गेटवर अंदाजे १०.४५ वाजताच्या दरम्यान गेलो होतो. मी गेटवर गेलो व मला तिथे वॉचमनने अडविले ही घटना अंदाजे पाच मिनिटे चालली असेल. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीला आरोपीने जी शिवीगाळ केली ती घटना मी प्रत्यक्षात पाहिली नाही, माझ्या पत्नीने मला सदर घटना सांगितली.

०९. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या हॉटेलमध्ये इंटरनेट मेंटेनन्सचे काम पहात होतो. पोयनाड, नागोठणे व वडखळ येथील बी.एस्.एन्.एल्.चे इंटरनेटचे मेंटेनन्स मी पाहतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी त्या ईलाइट हॉटेलमध्ये अभिनेते येणार होते. हे मला माहीत नाही की, हॉटेल ईलाइट थ्री स्टार आहे की फोर स्टार आहे. हे म्हणणे खरे आहे की, ईलाइट हॉटेलचा परिसर मोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिथे घटना घडली त्या ठिकाणी नवीन बंगल्याचे बांधकाम चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी विटा, रेती, सिमेंट पडलेले होते. घटना अंदाजे २० मिनिटे चालली होती. हे मला माहीत नाही की, घटनेच्या वेळी पंचायतीचे लोक मोजमाप घेण्यासाठी आले होते.

१०. माझ्या डोक्यामध्ये फाईट मारली असे मी सरतपासात सांगितले आहे. मला हे आठवत नाही की, मी पोलीसांना जबाब देताना डोक्यामध्ये फाईट मारली हे सांगितले होते की नाही. मला हे आठवत नाही की, मी पोलीसांना सांगितले होते किंवा नाही की, 'त्याने दोन्हीकडे फाईट मारलेली आहे.' मी पोलीसांना जबाब

देताना सांगितले होते की, माझ्या उजव्या हाताच्या करंगळीचा बोट फ्रॅक्चर झाला होता. सदर बाब माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझे टि–शर्ट फाटले होते. मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते की, माझ्या डाव्या कानाच्या येथून रक्त येत होते. सदर बाब माझ्या जबाबात का लिहीलेली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी माझा जबाब वाचला होता. ही चूक माझ्या लक्षात आली नव्हती. रक्त टि–शर्टवर सांडले होते का हे माझ्या लक्षात नाही.

११. मला चक्कर आल्यामुळे माझ्या लक्षात नाही की, माझ्या जखमेतून रक्त गळत होते की नाही. साक्षीदार सांगतो की, मला वाटते रक्त येत होते. मला हे सांगता येणार नाही की, टि शर्टवर रक्त सांडले होते की नाही. पोलीसांनी माझा टि शर्ट जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, चक्कर आल्यामुळे पुढे काय घ डले ते मला कळले नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो मारत होता हे मला आठवत आहे.

**प्रश्न** : चक्कर आल्यानंतर तुम्ही लगेचच मोटरसायकल घेवून निघून गेलात?

**उत्तर** : मी लगेच मोटरसायकल घेवून गेलो नव्हतो.

१२. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेलमध्ये अनेक कामगार कामावर आहेत.हे म्हणणे खरे नाही की, कामगारांनी मला उचलले होते व मला पाणी दिले. हे म्हणणे खरे आहे की, राठोड व त्याच्या मुलाने सोडवासोडव केली होती. मला हे लक्षात नाही की, त्यावेळी सोडवण्यासाठी किती लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीला हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले नव्हते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सायंकाळी पत्नीला सोडले होते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचे फुटेज हे

डी.व्ही.आर.मध्ये स्टोअर असतात. मी डी.व्ही.आर. पोलीसांना दिला नव्हता. मी स्वत: क्लीप काढून पोलीसांना दिलेल्या आहेत. पोलीसांनी माझ्या बाजूचेच व्हीडीओ क्लीप घेतलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी आयस्क्रीम व्हीडीओ एडिटर या ॲप्लीकेशनवरुन त्या क्लीप क्रॉप करुन काढून दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आयस्क्रीम व्हीडीओ एडिटर हा फ्रि सॉफ्टवेअर आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी हिक व्हीजन (Hick Vision) या ॲपमधून क्लीप क्रॉप करुन काढून दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, हिक व्हीजन (Hick Vision) सॉफ्टवेअर प्ले स्टोअरवर फ्रि उपलब्ध आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरकारमान्य ॲप यांचा उपयोग करण्यासाठी सरकारला शुल्क द्यावे लागते. मला हे माहिती नाही की, ए. आय्.च्या सहाय्याने व्हीडीओमध्ये बदल करु शकतो.

१४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला कोणती शिवीगाळ केली याबाबतचा उल्लेख माझ्या जबाबात नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात लिहीलेले नाही की, माझ्या शरीराच्या कोणत्या भागावर लाथांनी मारहाण केली. साक्षीदारास त्याचा जबाब दाखवण्यात आला. त्याच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग 'अ' आम्हाला दवाखान्यातून सोडल्यानंतर दि. ०२/०२/२०२३ रोजी सुमित माने, रा. वाघोडे यामधील '२०२३' हा शब्द चुकलेला आहे.

१५. माझ्या पत्नीला किती वाजता डिस्चार्ज दिला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जेन्टस् वॉर्डमध्ये होतो व माझी पत्नी लेडीज वॉर्डमध्ये होती. मला हे आठवत नाही की, माझ्या पत्नीचे ॲडमीट कार्ड बनवले होते की नाही. असे घडले नव्हते की, महिला पोलीस हवालदार शेरमकर यांनी मला दि. २६/०२/२०२६ रोजी सी.सी.टी.व्ही. फुटेज देण्यास सांगितले होते. साक्षीदारास

निशाणी क्र. २२ दाखवण्यात आले. त्यामधील दि. २६/०२/२०२६ मधील '२०२६' हे साल चुकलेले आहे.

१६. मला संगणकाचे ज्ञान असल्याबाबत प्रमाणपत्र मी पोलीसांना दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २२ कडील प्रमाणपत्रात सी.सी.टी.व्ही. फुटेज, डी.व्ही.आर. हे सुव्यवस्थित असल्याबाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २२ कडील प्रमाणपत्रात कुठल्या ॲपच्या सहाय्याने क्लीप काढून दिली याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सी.सी.टी.व्ही. फुटेज दोन वेगवेगळ्या कॅमेऱ्याचे आहेत. एक फुटेज मेन गेटचा आहे व दुसरा फुटेज एन्टरन्स गेटचा आहे. स्वामी कृपा डेव्हलपर्स या गेटवरील कॅमेरा वेगळा आहे. ईलाइट हॉटेलचा सी.सी.टी.व्ही. कॅमेरा वेगळा आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेलमधील कामगार, कंत्राटदार हे माझे व माझ्या पत्नीच्या परिचयाचे आहेत. मी संतोष पाटील याला ओळखत नाही. रतन गावंड याला मी ओळखत नाही. संदेश राऊळ याला मी ओळखत नाही. मला हे माहिती नाही की, माझी पत्नी रतन गावंड, संदेश राऊळ व संतोष पाटील यांना ओळखते किंवा नाही. मी राठोड व त्यांच्या मुलांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल मोठे असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, वॉचमन गेटवर येणाऱ्या जाणाऱ्यांची नोंद करतो. सी.सी.टी.व्ही. फुटेजचा ॲक्सेस माझ्या पत्नीला होता. साक्षीदार सांगतो की, मी मालकाला विचारुन त्याचा ॲक्सेस घेतला होता. मी त्या मालकांना लेखी पत्र देवून ॲक्सेस घेतला नव्हता. पोलीसांनी मालकांना लेखी पत्र दिले होते.

१८. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने हॉटेलमध्ये काम करत

असताना पैशांची अफरातफर केली होती. हे मला माहीत नाही की, त्या

संदर्भातील तक्रार आरोपीने करण चावला व भगवान सर यांना केली होती. हे म्हणणे खरे नाही की, भगवान सर हॉटेलमध्ये बहुतेक वेळा असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी हॉटेलला इंटरनेटची सुविधा व्यवस्थित देत नसल्याबाबत तक्रार होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीला पुढे करुन सदर खोटी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी हॉटेलमध्ये माझ्या गाडीवरुन स्लीप झाल्याने मला व माझ्या पत्नीला जखमा झालेल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जखमांच्या आधारे आरोपीविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणतीही शिवीगाळ व मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला लज्जा उत्पन्न होईल असे कोणतेही कृत्य आरोपीने केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात खोटा जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोट्या जबाबाच्या आधारे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ॲपच्या आधारे व्हीडीओ एडिट करता येतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना एडिटेड व्हीडीओ दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.                                ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१२/११/२०२५**.          मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्. **४०/२०२४**
निशाणी क्. **२८/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **आशुतोष प्रकाश पाटील**
वय सुमारे : २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
निवासस्थान : मु. श्रीगांव, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०१. दि. २६/०२/२०२४ रोजी मी पोयनाड पोलीस ठाण्यात माझे काम असल्यामुळे गेलो होतो. तेथे पोलीसांनी माझी सही घेतली. आता मला पंचनाम्यावरील माझी सही दाखवण्यात आली. अनु. क्. २ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही.

(**साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०२. मी जे. एस्. डब्ल्यू. कंपनीत नोकरीला आहे. माझ्या समक्ष राजेश पाटील यांनी पेन ड्राईव्ह हजर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पेन ड्राईव्ह जप्तीचा पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **४०/२०२४**
निशाणी क्र. **२९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **रोहीत किरण पाटील** |
| वय सुमारे | : | २३ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. श्रीगांव, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०१. दि. २६/०२/२०२४ रोजी मी कामानिमित्त जात असताना पोलीसांनी माझी सही घेतली. आता मला पंचनाम्यावरील माझी सही दाखवण्यात आली. पंचनाम्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही.

(**साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत** :

०२. मी जे. एस्. डब्ल्यू. कंपनीत नोकरीला आहे. माझ्या समक्ष राजेश पाटील यांनी पेन ड्राईव्ह हजर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पेन ड्राईव्ह जप्तीचा पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

:: २ ::

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०७/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.